INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 5 | JUNE - 2022

# दलित कवयित्रींच्या कवितेतील स्व-समाज टीका शोध आणि बोध

युवराज डोईफोडे
संशोधक




दलित साहित्यात आत्म टीकाच्या माध्यमातून स्व समाजावर टीका करताना दिसून येतात. कवी-कवयित्री अंतर्मुख होऊन आत्मशोध घेण्याच्या दृष्टीने आत्मटीका करतात. यातून वास्तवतेचे भान असल्याचे आढळून येते. डॉ. जया पाटील म्हणतात— "अलिकडच्या काळात दलित कवयित्री 'आत्मशोध' आणि 'स्व-समाज' कवितेतून अभिव्यक्त करतात. एकार्थाने 'स्वतःच स्वतःवर केलेली टीका' असे या आत्मशोधाचे स्वरूप असल्याने आपल्या समाजातील उणिवांवर या कवयित्री कठोरपणे भाष्य करताना दिसून येतात."[1]

दलित चळवळीचे मूल्यांकन या द्वारे कठोरपणे केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना 'माणूस' म्हणून जगण्याचे शिकविले परंतु समाजातील काही वर्ग विचारांची वैचारिकता बाजूला सारून व्यवस्थेला शरण जातो. आपले आत्मभान ओलीस ठेवून स्वत्वाला विसरून जातो. या कसोटीवर आत्मशोध दलित कवी-कवयित्रींनी घेतलेला आहे. यातूनच स्व-समाज टीका संकल्पना समोर आली. दलित साहित्यात अभावाने आढळणारा हा घटक दलित साहित्याचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहे. तसे पाहता स्व-समाज टीकेचे बळ फुले-आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या विचारातून पुढे येते. कवि-कवयित्री स्वतःकडे तटस्थपणे पाहू लागतात. संध्या रंगारी यांच्या कवितेमध्ये स्व-समाजाची टीका विद्रोही स्वरूपी येते.

" हे महामानवा
तुझीही बारी येईल
खंडोबासारखी
वारी सुरू होईल
देवत्व बहाल करणा-या
विचारांना मारू पाहणा-या
संस्कृतीला
मुळातून उखडायला हवं
आपल्याच आया-बायांच्या देहात
देव का शिरतात ?
संशोधन करायला हवं "[2]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलिततांना परिवर्तनवादी विचार स्वीकारण्यास प्रवृत्त केले. देवपूजनाला विरोध केला. तरीही 'देवत्व' ही कल्पना समाजात रूजते आहे. तसेच व्यक्तीपूजनेला नाकारणा-या आंबेडकरांच्या विचाराकडे दलित बांधवाचे दुर्लक्ष होत आहे. सद्या परिस्थितीत आंबेडकरांनी बुद्धांना देवत्व बहाल करून मूर्तीपूजा केली जाते. याविषयीचा संताप दलित कवयित्रीने कवितेतून व्यक्त केला आहे.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकारांनी हिंदूच्या समातन प्रवृत्तीला कंटाळून बहुजनांसाठी त्यांच्या उद्धारासाठी बौद्ध धर्म स्वीकारला. बाबासाहेबांनी बुद्धांना देवाऐवजी गुरू मानले. परंतु आज त्यांना देवत्व बनविणा-या स्व-समाजावर टीका करतात.

दलित कवी-कवयित्रींनी राजकीय घडामोडीवरही भाष्य केले आहे. दलित समाजातील राजकारण वैचारिक दृष्टीकोण विसरून सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेसाठी लाचारी पत्कारीत असल्याची खंत दलित कवी प्रमाणे दलित कवयित्रींच्या कवितेतून येते. संध्या रंगारी यांनी स्व-समाजाच्या राजकीय घडामोडीवर टीका करताना म्हटले की—

"मातोश्रीच्या दारात
पँथरची झाली शेळी
'श्री' म्हणे ही बाळीची खेळी
प्रकाशाचा नाही पडला प्रकाश
अंधारून आलं फार
गाणं गाऊन गवई थकला
कवड्यांचा झाला मार
तूच एकटा नाहीस रे कर्णा
माझ्याही रथाचं रूतलयं चाक..."[3]

दलित समाजातील नेते आणि त्यांच्या फसलेल्या नेतृत्वाचा लेखा-जोखा कवयित्रीने येथे अभिव्यक्त केला आहे. परिवर्तनवादी विचारसरणी आणि हिंदुत्ववादी विचारसरणी या दोन्हीही परस्परविरोधी विचारधारा आहेत. याचा विसर पडलेल्या राजकीय दलित नेतृत्त्वावर प्रतिघात कवयित्री करते. दलित नेत्याप्रमाणेच दलित संघटना देखील स्वार्थ आणि सत्ता पोटी लाचार होते ही अप्रामाणिकता आंबेडकरी विचाराला अमान्य असल्याचे समकालीन वास्तावाचा वेध दलित कवयित्रीने घेतला आहे.

दलित कवयित्रींनी स्व-समाजाच्या समरतेला विरोध केला. समरसत्तेचा डांगोरा पिटत वाटेल तिथे लोळणा-यांचे मुखवटे फाडताना कवयित्री प्रतिभा अहिरे म्हणतात—

"आपल्या आभाळाची सारी निळाई
दिवसेंदिवस कुठं हातात तर कुठं भगव्यात शिरतीय
आपली परिवर्तनासाठीची लढाई
जन्मण्यापूर्वीच गर्भातच मरतीय
क्रांती अन् संघर्ष नुसतेच हात चोळताहेत
समर सत्तेच्या नावाखाली वाटेल तिथे लोळताहेत
आपल्यासाठी इथं तिथे समरसत्तेचे देव्हारे
सजवले अन् गाजवले जात आहेत
ज्यांना त्यांच्या मरणाचे सूतक नाही
ते आपल्या बापासाठी गाताहेत"[4]

परिवर्तनवादी विचारसरणीचे 'निळाई' सत्तेसाठी परस्पर भिन्न विचारधारांशी समरसत्ता होत आहे. हीच खंत कवयित्री येथे मांडते. वैयक्तिक स्वार्थ, पद, प्रतिष्ठा यासाठी परिवर्तनवादी विचारांशी बेईमानी करू पाहत असल्याचे टीका कवयित्री करताना दिसते.

दलित नेत्यांनी स्वत्व विसल्याने त्याच्या झालेल्या अवस्थेचे वर्णन करताना संध्या रंगारी म्हणतात—

"नेता म्हणवतोस स्वतःला दलितांचा
पण खरं सांग
कुठल्याच अर्थाने तू दिसत नाहीस मला दलित
ना व्यवहारात ना विचारात
ना दृष्टिकोणात ना बांधिलकीत
ना आचरणात ना जाणिवांत

बाबासाहेबांचा चेला म्हणतोस ना
मग कुठं आहे तुझ्याजवळ कॅडर
पार्टीनं दत्तक घेतलंय तुला
निळा गंध
निळी टोपी
निळा सलाम
तरी तू गुलाम....?"[5]

दलित नेत्यांनी स्वार्थपणाला आहारी जाऊन पत्कारलेल्या गुलाम विषयी बेधडक शब्दात टीका केलेली आहे.

दलित समाजातील स्व-समाज टीकामागील आणखी एक कारण म्हणजे परस्परांतील विसंवाद होय. दलितामधील अनेकांनी तडजोडीचे राजकारण केले. स्वार्थी भावना ठेवून केवळ दलित चळवळीशीच नव्हे तर आंबेडकरी चळवळीशी विचारांशी फारकत घेतली आहे. दलित हे नेतृत्त्व करणा-या हिंदुत्वाल्यांच्या आहारी गेल्याने समाजामध्ये विसंवाद सुरू झाला. या वस्तुस्थितीचे वर्णन करताना कवयित्री म्हणते—

"विसरून बा भीमाला जगण्यात धुंद झाले
वारसा तुझे भीमा हे लढण्यात धुंद झाले
जो तो इथे शहाणा तू मोहरच त्यांचा
गट पाहुनी पुढारी ठरण्यात धुंद झाले"[6]

दलित चळवळीचे आणि नेतृत्वाचे भरकटलेपण या कवयित्रींनी मार्मिकपणे चित्रित केले आहे. स्वार्थासाठी दलित चळवळीतील नेते, पुढारी आणि कार्यकर्ते विचारांशीच द्रोह करू लागल्याचे संताप कवितेतून व्यक्त केला आहे.

"बाबा तू सांगितलासं
शिका संघटित व्हा संघर्ष करा
आम्ही शिकलो
संघटित झालो नाही
पण करीत राहिलो संघर्ष
एकट्या दुकट्याने
ताटात पदं
आम्ही जेऊन उठलो
खरखट्या हाताने
पाणी पिलं
त्यांच्याच ओंजळीनं
एकेकट्याला मग त्यांनी
खिंडीत गाठलं
उठूच नये पुन्हा
असं गारद केलं"[7]

बहुजनांनी आत्मविश्वासाने जगावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी क्रांतीकारी विचारांची शिकवण दिली. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' हा संदेश दिला. परंतु समकालीनतेचे वास्तव विचित्र आहे. शिकून आत्मभान आलेले अनुयायी स्वार्थी बनले आणि व्यवस्थेचे गुलाम झाले. संघटीत होणे त्यांना जमलेच नाही. पुढे कवयित्री म्हणते—

"तू नाकारलीस व्यक्तिपूजा
आम्ही उभारले तुझे पुतळे
आम्ही तुझे भक्त
किती अशक्त
आम्ही तुझे वाटेकरी
आम्ही तुझे मारेकरी

आम्ही तुझे दावेकरी
आम्ही मतिमंद
नवा ब्राम्हणवाद पेरत गेले "[8]

आपापसातील हा संघर्ष कवयित्रीला उद्विग्न करतो. स्वतःच्या स्वार्थापोटी बहुजन कार्यकर्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देवत्व बहाल केले. वैचारिक संघर्षाला विसरून मती भ्रष्ट समाजाविषयी संताप तीव्र करताना पुढे त्या म्हणतात—

"स्लो पॉयझनिंग झालं
नसानसात विष भिनलं
आवळलेल्या मुठी सुटल्या
आमच्या मूव्हमेंट
आम्हीच लुटल्या
मताचं मूल्य आम्हांला राखता आलं नाही
चवदार पाण्याशी इमान ठेवता आली नाही
तू पेटवलेल्या संगराची ठिणगी धराता आली नाही
चौदा एप्रिल.... ......
आमच्यासाठी उत्सव
सहा डिसेंबर आमच्यासाठी
शोकोत्सव
आंबेडकर बप्पा मोरया "[9]

'स्लो पॉयझनिंग' ला दलित कार्यकर्ते बळी पडून डॉ. आंबेडकरांच्या जयंती आणि पुण्यतिथीला उत्सवाचे रूप आले. दलित समाजाचे होत जाणारे हे अद्यःपतन कवयित्रीने स्पष्टपणे मांडले आहे.

तसे पाहता दलित चळवळ आणि दलित साहित्य यांचा परस्परसंबंध अत्यंत एकनिष्ठ आहे या चळवळीच्या काळात सामाजिक प्रश्न हाताळले. या चळवळीचे कार्यकर्ते लेखक, राजकारणी आहेत. लेखक, कवी-कवयित्रीच्या अभिव्यक्तीतून हे परस्पर पुरकत्व अधोरेखित झाले आहे. परंतु अलीकडच्या काळात स्वार्थी भावनांना आवर त्यांना घातला गेली आणि त्यांती वैचारिक पातळी खालावत गेली आणि त्याचे पडसात साहित्यातून उमटलेले दिसतात. म्हणून या कवितामधून केलेली स्व-समाज चिकित्सा महत्त्वपूर्ण आहे. संध्या रंगारी, प्रतिभा अहिरे, कविता मोरवणकर-पवार अन्य दलित कवयित्रीच्या कवितेतून हा विषय समर्थपणे टिपण्यात आला आहे.

## संदर्भ—


1 दलित कवयित्रींची कविता स्वरूप आणि चिकित्सा, जया पाटील, पृ.सं. 85.
2 कवडसे, संध्या रंगारी, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. 2003, पृ.सं. 32.
3 संध्यारंग, संध्या रंगारी, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ. 2010, पृ.सं. 126.
4 मला हवी असणारी पहाट, प्रतिभा अहिरे, साद प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. 2009, पृ.सं. 28.
5 संध्यारंग, संध्या रंगारी, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ. 2010, पृ.सं.183.
6 मुक्ता, कविता मोरवणकर-पवार, पृ.सं. 71.
7 संध्यारंग, संध्या रंगारी, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ. 2010, पृ.सं.140.
8 तत्रैव, पृ. सं. 140-141.
9 तत्रैव, पृ.सं. 141.